कला अकादमी गोवा
कांपाल–पणजी
कअ/काविवि/भ.स्प/२०२४–२५/५७८
दि. २१/०६/२०२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

गोवा कला अकादमी आयोजित पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष , महिला व बाल कलाकार भजनस्पर्धा जाहीर करण्यात आली असून सदर स्पर्धेच्या प्रवेशिका नियम व अटींसहित आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पणजी–गोवा येथील कला अकादमीच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. इच्छुकांनी आपले पूर्ण भरलेले अर्ज दि. २७ जून २०२४ पर्यत रोजी कार्यालयीन वेळेत सादर करावे. यंदा स्पर्धेची सुरुवात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात दरवर्षीप्रमाणे महिला कलाकारांच्या विभागीय भजन स्पर्धेपासून होणार आहे.

कला अकादमीची ही स्पर्धा फक्त गोमंतकीय कलाकारांसाठीच असून भजनी कलाकारांना पुरुष, महिला किंवा बाल अशा कोणत्याही एकाच विभागातील पथकात सहभागी होता येईल. बाल कलाकारांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १६ वर्षे वयाची मर्यादा असून स्पर्धेची प्रवेशिका सादर करण्याच्या अंतिम दिवशी १६ वर्षाखालील कलाकारांना बाल कलाकार स्पर्धेत सहभागी होता येईल तसेच सदर दिवशी १६ वर्षे पूर्ण केलेल्या कलाकारास पुरुष/महिला भजन स्पर्धेतच सहभागी व्हावे लागेल.

तरी भजन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भजन पथकांनी पुर्णरीत्या भरलेल्या आपल्या प्रवेशिका दि. २७ जून २०२४ पर्यंत कला अकादमीच्या कार्यालयात दाखल कराव्यात, त्यानंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही असे अकादमीने कळविले आहे.

(श्री. संजीव ना. झर्मेकर)
कार्यक्रम अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,

८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड /एसएस